# सपकाळ फार्मसीला देशात ८० व राज्यात २५ वे रॅंकिंग

केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे गेल्या वर्षापासुन नॅशनल इन्स्टिटयूशनल रॅंकिंग फ्रेमवर्कच्या माध्यमातुन देशातील अव्वल शैक्षणिक संस्थांची यादी जाहीर करण्यात येते. या यादीत औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांमध्ये अंजनेरी येथील कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, आर. जी. सपकाळ कॉलेज ऑफ फार्मसी अंजनेरी, नाशिक या महाविद्यालयाचा राष्ट्रीय पातळीवर ८० व राज्य पातळीवर २५ क्रमांक लागला आहे. यासाठी संबंधित संस्था, विद्यापीठ, महाविद्यालय यांच्याकडे उपलब्ध पायाभुत सुविधा, रोजगाराच्या संधीसह अन्य विविध पैलुंचा विचार करीत गुण दिले जातात. तसेच या महाविद्यालयास नाशिक विभागातुन द्वितीय क्रमांकाचे नामांकन देण्यात आलेले आहेत. महाविद्यालयामार्फत विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सुमारे सात विविधप्रकारच्या योजना राबविल्या जातात, तसेच सुमारे १५० पेक्षा जास्त शोधनिबंध विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केलेले असुन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत होणाऱ्या 'इनोव्हेशन' व 'अविष्कार' या स्पर्धामध्ये गेली चार वर्ष सातत्याने विद्यार्थी भरघोस यश मिळवून पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधीत्वही राज्यस्तरावर केलेले आहे, संपुर्ण महाराष्ट्रात 'प्रधानमंत्री जनऔषधी केंद्र' दालन असलेले हे एकमेव महाविद्यालय असुन विविध आंतराष्ट्रीय दर्जाच्या औषध कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्हयु देखील नियमीतपणे घेतले जातात. या व अशा अनेक निसर्गरम्य आणि प्रदूषण विरहीत वातावरणात विद्यार्थ्यांच्या संर्वागिण विकासाला परामर्ष या 'NIRF'या केंद्र सरकारच्या संस्थेमार्फत होऊन हे मानांकन सपकाळ फार्मसीला बहाल करण्यात आल्याने संस्थेचे अध्यक्ष डॉ. रंविद्र सपकाळ, उपाध्यक्षा सौ. कल्याणी सपकाळ व प्रा. डॉ. आर. बी. सौदागर यांनी सर्वांचे अभिनंदन केले.